# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 08/08/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## अनैतिक देहव्यापार करण्यास प्रवृत्त करणारे आरोपी गजाआड

## पोलीस स्टेशन सावनेर यांची कारवाई

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत वेलकम लॉज न्यु गुजरखेडी सावनेर येथे दिनांक ०७/०८/२०२३ चे १३.१५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील पोलीस स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, **आरोपी नामे— १) तपन दत्तात्रय रूषीया वय २८ वर्ष, २) धिरज दत्तात्रय रूषीया, वय ३२ वर्ष ३) रजत दत्तात्रय रूषीया, वय ३१ वर्ष वरील १ ते ३ रा. मानकर पेट्रोल पंप, राधाकृष्ण हॉल समोर मेश्राम यांचे घरी किरायाने ता. सावनेर ४) प्रणय विनोद गुडधे, वय २३ वर्ष रा. ईसापुर ह. मु. पाटणसांवगी ता. सावनेर** हे स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता मुलींना पैशाचे आमिश देवुन देहव्यापारास प्रवृत्त करून त्यांना ग्राहकांना पुरवुन नमुद ठिकाणी येण्यास सांगुन तेथे देह व्यापारास जागा उपलब्ध करून देउन पिडीत मुलींना ग्राहकास पुरवुन देहव्यापार करवुन घेतात. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टॉफ यांनी गुप्त माहिती व्दारे लॉज चकिंग करीता गेले असता वेलकम लॉज न्यु गुजरखेडी येथे पाश्चिम बंगाल येथुन आलेल्या दोन मुलीचे लॉजच्या रजिस्टरवर नोंद चेक केली असता यातील आरोपी क्र. ४ हा लॉज मधुन संशयीत पळुन गेल्याने यातील पिडीत मुलींना घटनास्थळी विचारपुस केली असता त्यांनी आरोपी क्र. १ व २ यांनी वेश्याव्यवसाय करिता वेलकम लॉज येथे पुढील १० दिवसा करिता ठाणे शहर येथुन बोलवण्यात आले आहे. असे सांगितल्यावरून स्टॉफ यांनी घटनेची शहानिशा केली असता वर नमुद पिडीत महिलांना वेश्याव्यसाय चालविण्या करीता एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी आणुन पिडीतांना वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले असुन रजत दत्तात्रय रूषीया याने भाडे तत्वावर चालवत असलेल्या वेलकम लॉजची रूम नंबर १०३ यांचा कुंटणखाना म्हणुन वापर करणार आहे माहीती असतांना ती वापरण्यास हेतुपुरस्पर परवानगी दिली असुन आरोपी क्र. ४ याने पिडीतेला अनैतिक संबंध प्रस्थापित करून तिला वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सहायक पोलीस निरीक्षक मंगला मोतीरामजी मोकाशे, पोलीस स्टेशन सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३(2) (a) ,५(१), (क), (ग), (घ), स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार अधिनीयम १९५६ (सिट अधिनियम पुननिर्मित) कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. १), ३), ४) यांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक भस्मे पोस्टे सावनेर मो. नं. ९७६४९४६८०८ हे करीत आहे.

# विनयभंग

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक ०६/०८/२०२३ चे सकाळी ०६.०० वा. सुमारास यातील **आरोपी नामे– शरद बोपचे रा. शिल्लेवाडा वस्ती** याने फिर्यादीचे घरासमोर जाऊन जोरजोराने ओरडून फिर्यादीचे घरावर गोटे मारले. फिर्यादी ही बाहेर आली असता यातील आरोपी याने फिर्यादीचा हात पकडून जवळ ओढून फिर्यादीच्या मनाला लज्जा होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(अ), २९४, ३३६, ५०६ भांदवि. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव पोस्टे खापरखेडा मो. नं. ९९२३१०४३१०० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**